महत्वाचे

जा.क्र./विप्र-७/विघयो/मासु/१६-१७/ १०६ /२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०१७

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद ---------( सर्व )

२) कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद ---------( सर्व )

**विषय :- सन २०१६-१७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ :-** १) कृषि, व पदुम विभाग शासन निर्णय क्र. विघयो-१५१६/प्र.क्र.२४०/४-अे, दि. ३० जुलै, २०१६
२) कृषि, व पदुम विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. विघयो-१५१६/प्र.क्र.२४०/४-अे, दि. २४ ऑगस्ट, १६
३) आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र./विप्र-७/विघयो/मासु/१६-१७/४५१/२०१६, दि.२५/८/२०१६
४) कृषि, व पदुम विभाग शासन निर्णय क्र. विघयो-२०१६/प्र.क्र.१७६/४-अे, दि. ०५ जानेवारी, २०१७
५) कृषि, व पदुम विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. विघयो-१५१६/प्र.क्र.१७६/४-अे, दि. २३/०१/२०१७
६) शासन पत्र विघयो-१५१६/प्र.क्र.१७६/४-अे, दि. २२ फेब्रुवारी, २०१७

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना राज्यात राबविण्यासाठी शासनाने संदर्भिय दि. ३० जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत शेतकऱ्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यास अर्थसहाय्यासाठी रु. १९६३४.३१ लाख निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. या अनुषंगाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना राज्यात राबविण्यासाठी आयुक्तालयाच्या संदर्भिय दि. २५/८/२०१६ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर योजना दिर्घकालावधीपासुन राबविण्यात येत असल्याने योजनेचे पुर्नविलोकन करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांसाठी प्रचलीत असलेली विशेष घटक योजना व मा. मंत्री (वित्त) यांनी घोषीत केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या दोन योजना स्वतंत्रपणे न राबविता बदललेल्या परिस्थीतीची गरज विचारात घेवून सध्याची प्रचलीत विशेष घटक योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने राबविण्यास संदर्भिय दि. ०५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

योजना अंमलबजावणीच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत पाठविण्यात येत आहेत तसेच कृषि विभागाच्या संकेत स्थळावर (www.mahaagri.gov.in) त्या प्रसिध्द करण्यात येत आहेत. **दि. ०५ जानेवारी २०१७ चे शासन निर्णयाचे अधिन राहून सदर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.** त्यानुसार योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही करण्यात यावी.

**संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर.**

(१) मा. अपर मुख्य सचिव, (कृषी व पणन) कृषि व पदुम विभाग , मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(२) मा. सचिव (सामाजिक व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
(३) मा. संचालक, सामाजिक न्याय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

**प्रत :** माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(१) विभागीय कृषि सहसंचालक, ------------------------------------------------ (सर्व)
(२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद------------------------- (सर्व)

## सन २०१६-१७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना राबविण्याकरीता

# मार्गदर्शक सुचना

**प्रस्तावना :** अनुसूचित जाती/नवबौध्द शेतक-यांचे कृषि उत्पन्न वाढवून त्यांना दारिद्र्य रेषेवर आणण्यास सहाय्य करण्याचे दृष्टीने शासनाच्या कृषि विभागामार्फत विशेष घटक योजना सन १९८२ पासून राज्यात राबविण्यात येते. सदर योजनांतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्यांना १) जमीन सुधारणा, २) निविष्ठा पुरवठा, ३) पीक संरक्षण/शेतीची सुधारीत अवजारे, ४) बैलगाडी, ५) बैलजोडी/रेडेजोडी, ६) इनवेल बोअरिंग, ७) जुनी विहीर दुरुस्ती, ८) पाईप लाईन ९) पंप संच १०) नवीन विहीर ११) शेततळे १२) परसबाग लागवड १३) तुषार/ठिबक सिंचन संच व १४) ताडपत्री या बाबींचा लाभ देण्यात येत आहे. सदर योजना दिर्घकालावधीपासुन राबविण्यात येत असल्याने योजनेचे पुर्नविलोकन करण्याचा निर्णय शासनाने घेतला. तसेच मा. मंत्री (वित्त) यांनी सन २०१६-१७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नवीन योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनवण्यासाठी विहीर खोदण्याकरीता रु. २.०० लाखापर्यंत अनुदान देण्यात येईल तसेच विहीरीवर विद्युत पंपसंच बसविणे आणि जेथे ग्रीड मधुन वीज पुरवठा करणे शक्य नसेल तेथे सौर उर्जेतुन वीज जोडणी देण्यात येईल व या माध्यमातून त्यांच्या शेतीची उत्पादकता वाढविण्यास मदत होईल अशी घोषणा केली.

प्रचलीत विशेष घटक योजनेमध्ये विहीर, पंपसंच या घटकांचा समावेश आहे. वास्तव अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांसाठी प्रचलीत असलेली विशेष घटक योजना व मा. मंत्री (वित्त) यांनी घोषीत केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या दोन योजना स्वतंत्रपणे न राबविता बदललेल्या परिस्थीतीची गरज विचारात घेवून जमीनीतील ओलावा टिकवुन ठेवण्याच्या दृष्टीकोनातून (Moisture Security) सध्याची प्रचलीत विशेष घटक योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने राबविण्यास संदर्भिय दि. ०५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सन २०१६-१७ मध्ये सदर योजना राबविण्याचे दृष्टीने पुढील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. सदर योजनेंतर्गत खालील घटकासाठी त्यापुढे नमूद रकमेच्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

| अ.क्र. | बाब | अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २५००००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५००००/- |
| ३ | इनवेल बोअरींग | २००००/- |
| ४ | पंप संच | २५०००/- |
| ५ | वीज जोडणी आकार | १००००/- |
| ६ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | १०००००/- |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच | मंत्रीमंडळ उपसमितीने निश्चित केलेल्या सुत्रानुसार |

१. वरील बाबीपेकी नवीन विहीर व त्यासोबत पंपसंच, वीज जोडणी आकार आणी सुक्ष्म सिंचन संच या घटकांची अंमलबजावणी सन २०१६-१७ या आर्थीक वर्षात करण्यात येईल. नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणा-या शेतक-यास विहीरीसोबतच पंपसंच, वीज जोडणी आकार असे एकत्रीत रु.२.८५ लक्ष च्या मर्यादेत व सुक्ष्म सिंचनासाठी मंत्रीमंडळ उपसमितीने निश्चित केलेल्या सुत्रानुसार अनुज्ञेय अनुदान असे एकत्रीत पॅकेज देण्यात येईल. सुक्ष्म सिंचन या घटकाच्या अनुदानाची मर्यादा व कार्यपध्दती निश्चित होईपर्यंत लाभार्थ्यास नवीन विहीरीसोबत फक्त पंपसंच व वीजजोडणी आकार एवढयाच घटकांचा लाभ देण्यात यावा. विहीरीवर विद्युतपंप बसवुन ग्रीडमधुन वीज पुरवठा शक्य नसल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मंजूर केलेल्या सोलर पंपासाठी लाभार्थी हिस्साच्या अनुदानाची रक्कम (पंपसंच व वीजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत रु. ३५०००/-) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस अदा करुन लाभार्थ्यांला दिलेल्या लाभामध्ये सदर अनुदानाच्या रकमेची नोंद घेण्यात यावी. सन २०१६-१७ या वर्षात ठरवुन दिलेल्या

उद्दीष्टांएवढया विहीरी मार्च २०१७ अखेरपर्यंत पुर्ण करणे शक्य होणार नाही, विहीरीचे काम पुर्ण झाल्यानंतर त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देणे आवश्यक आहे हि वस्तुस्थीती लक्षात घेता विहीरीसोबतच्या पॅकेजचा लाभ पुढील आर्थिक वर्षात देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. या पॅकेजचे लाभासाठी नवीन लाभार्थ्यासह या वर्षात प्रचलित विशेष घटक योजनेंतर्गत नवीन विहीर या घटकासाठी निवड झालेले लाभार्थीही पात्र राहतील. याबाबत चे सविस्तर सुचना परिशिष्ट १ मध्ये नमुद करण्यात आली आहे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा आहे. त्यामुळे विशेष घटक योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी यापुर्वी नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्ती या घटकांचा लाभ घेतला असेल अशा लाभार्थ्यां व्यतिरिक्त इतर सर्व लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती व शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण यापैकी एका घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देता येईल. त्याचप्रमाणे नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा यापुर्वी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पंपसंच, वीज जोडणी आकार व सुक्ष्म सिंचन संच या घटकांचा लाभ अनुज्ञेय राहील.

३. सदर योजनेतील जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरींग व शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण या घटकांची अंमलबजावणी सन २०१७-१८ या वर्षापासुन करण्यात येईल. याबाबतच्या मार्गदर्शक सुचना यथावकाश निर्गमित केल्या जातील.

४. प्रचलित विशेष घटक योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षात निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना, उर्वरित सर्व घटकांसाठी (नवीन विहीर, त्यासोबतचे पंपसंच व सुक्ष्म सिंचन संच वगळून) सदर योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या दरानेच व विहीत मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

५. लाभार्थ्याला देय अनुदानाची रक्कम त्याच्या बँक खात्यावर आरटीजीएस द्वारे जमा करण्यात येईल. या बाबत शासन निर्णय क्र.सुकृओ-२०१६/प्र.क्र.३०१/११ओ दि.२१ जानेवारी २०१७ नुसार कृषि विभागाद्वारे राबविण्यात येणा-या विविध केंद्र व राज्य योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषि औजारासंदर्भात थेट लाभ हस्तांतरण (DBT) कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

६. सदर योजनेंतर्गत' लाभार्थीची निवड प्रक्रियाआयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र./विप्र-७/विघयो/मासु/१६-१७/४५१/२०१६, दि.२५/८/२०१६ नुसार करण्यात यावी. तसेच लाभार्थ्यांकडे आधार कार्ड असणे आवश्यक असुन, सदर आधार कार्ड त्याचे स्वतःचे बँक खात्याशी संलग्न असणे आवश्यक राहील.

७. सदर योजेंतर्गत ७० टक्के अनुदानाचा लाभ अल्प व अत्यल्प भुधारक शेतक-यांना देण्यात येईल.

८. प्रचलीत विशेष घटक योजनेमध्ये मंजूर सुक्ष्म सिंचन घटकाची अंमलबजावणी दि. ३० जुलै, २०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे करण्यात यावी व डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन या घटकाच्या अनुदानाची मर्यादा व कार्यपध्दती निश्चित होईपर्यंत लाभार्थ्यास नवीन विहीरीसोबत फक्त पंपसंच व वीजजोडणी आकार एवढयाच घटकांचा लाभ देण्यात यावा.

९. कार्यक्रमाची अंमलबजावणी त्या वर्षात उपलब्ध झालेल्या अनुदानाच्या मर्यादेत पुर्ण करण्यात यावी.

१०. योजनेचा मासिक प्रगती अहवाल विहीत प्रपत्रामध्ये प्रत्येक महिन्याच्या **५ तारखेपर्यन्त** कृषि आयुक्तालयास, विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हाधिकारी व समाज कल्याण विभागाकडे नियमीतपणे पाठविण्यात यावा. योजनेचे मासिक प्रगती अहवाल दरमहा सादर करण्याची जबाबदारी जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांची राहील. अहवालाची प्रत इमेलव्दारे कृषि आयुक्तालयास ddaposcptsp@rediffmail.com वर पाठवावी. तसेच विभागीय कृषि सह संचालक यांनीही नियमितपणे आढावा घेऊन विभागाचा संकलित अहवाल नियमितपणे कृषि आयुक्तालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

**संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

## परिशिष्ट १
## नविन विहीर लाभाकरीता सविस्तर सुचना

१. **लाभार्थी पात्रतेच्या अटी**

१. लाभार्थी हा अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकरी असला पाहिजे.

२. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

३. शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे.

४. लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक.

५. अनुदान वितरणासाठी लाभार्थ्यांचे बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

६. दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यास प्राधान्य देण्यात यावे.

७. दारिद्रय रेषेखालील नसलेले अनुसूचित जाती / नवबौध्द शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १५००००/- पेक्षा जास्त नसेल तर या योजनेचा लाभ घेण्यास ते पात्र असतील.

८. विहीरीचा लाभ घेण्यासाठी कमीत कमी ०.४० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे.

९. प्रस्तावित विहीर पुर्वीपासून अस्तित्वात असलेल्या विहीरीपासुन ५०० फुटापेक्षा जास्त अंतरावर असावी.

१०. लाभार्थीच्या ७/१२ वर तसेच प्रत्यक्षात विहीर असल्यास त्याची योजनेसाठी निवड करता येणार नाही.

११. लाभधारकाकडे तलाठी यांच्या स्वाक्षरीचा एकूण क्षेत्राचा दाखला आवश्यक.

१२. भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडून पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र वरिष्ठ, भु-वैज्ञानिक यांचेकडील आवश्यक.

१३. यापूर्वी राज्य शासन / केंद्र शासन, जिल्हा परिषदेच्या निधीतून सिंचन विहीर या सुविधेचा लाभ घेतलेला नसावा.

१४. इतर योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहीलेल्या अपुर्ण विहीरीचे काम पुर्ण करण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

२. **विहीरीसाठी अर्ज व त्यावरील कार्यपध्दती :-**

अ) वैयक्तिक सिंचन विहीर मंजुरीसाठी अर्जदाराने ग्रामसभेची मंजूरी घेवून अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समितीकडे करावा.

ब) ग्रामसभेने शिफारसीत केलेल्या लाभार्थी योजनेत निवडीत अटी शर्ती पुर्ण करीत असल्यास त्याने दिलेल्या अर्जाची पोहोच गट विकास अधिकारी यांनी तात्काळ द्यावी.

क) उपरोक्त प्रमाणे विहीरीच्या मागणीसाठी प्राप्त झालेले अर्ज कृषि अधिकारी (विघयो) क्षेत्रीय पाहणी करुन शिफारसीसह जिल्हा स्तरीय निवड समितीकडे निवडीसाठी सादर करण्यात यावेत.

ड) प्राप्त अर्जातून मंजूर करावयाच्या लाभधारकाची यादी जिल्हास्तरीय निवड समितीने प्राधान्यक्रमानुसार मंजूर करावी व त्याबाबतचे लेखी आदेश कृषि विकास अधिकारी यांनी संबंधीत शेतकऱ्यांना पंचायत समितीमार्फत अर्जदारांना कळविण्यात यावेत.

इ) योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारणेकरीता सद्यस्थितीत सॉफटवेअर उपलब्ध नसल्याने सन २०१६-१७ या वर्षात ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यापासुन सुट देण्यात येत आहे. मात्र सन २०१७-१८ या वर्षापासुन अर्ज ऑनलाईनच स्वीकारण्यात यावेत.

३. **सिंचन सुविधा म्हणून विहिरींना मंजूर करण्याबाबतच्या अटी**

अ) भूजल सर्वेक्षण यंत्रणा GSDA च्या व्याख्येप्रमाणे सेमीक्रिटिकल, क्रिटिकल, ओव्हर एक्स्प्लायटेड क्षेत्रामध्ये वैयक्तिक लाभाच्या सिंचन विहिरी घेवू नयेत.

ब) प्रत्येक भागाची स्थानिक व भौगोलिक परिस्थिती भिन्न असल्यामुळे विहिरीची कामे मंजूर करताना मनरेगा अंतर्गत सिंचन विहीर कार्यक्रमासाठी निर्गमित शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१, दि. १७ डिसेंबर २०१२ नुसार विभागीय आयुक्त स्तरावरील समितीने निर्धारित केलेले तांत्रिक निकष वापरण्यात यावेत. मात्र वित्तीय मर्यादेच्या आतच अनुदान देय राहील.

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती व शेततळयाचे प्लॅस्टी अस्तरीकरण यापैकी एकाच घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील.

४. **तांत्रिक मापदंड**

महाराष्ट्र हे मोठे राज्य असुन प्रत्येक भागाची स्थानिक व भौगोलिक परिस्थिती भिन्न आहे त्यामुळे संपुर्ण राज्यासाठी विहिरीचा एकच आकार निश्चित करणे शक्य नाही. त्यास्तव विहिरींची कामे मंजूर करताना मनरेगा अंतर्गत सिंचन विहीर कार्यक्रमासाठी निर्गमित शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१, दि. १७ डिसेंबर २०१२ नुसार विभागीय आयुक्त स्तरावरील समितीने निर्धारित केलेले तांत्रिक निकष वापरण्यात यावेत.

५. सदर योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या सिंचन विहीरीसाठी विहीर पुर्नभरण ही बाब शेतकऱ्याने स्वखर्चाने राबविणेबाबत उद्युक्त करण्यात यावे.

६. **विहिरीच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देणे**

यापुर्वी राबविण्यात येत असलेल्या विशेष घटक योजनेमध्ये तांत्रिक मंजूरी व प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत जी कार्यपध्दती अवलंबिण्यात येत होती तीच कार्यपध्दती या योजनेमध्ये नवीन विहीरीच्या अंमलबजावणीमध्ये अवलंबण्यात यावी.

७. **विहीर कामाच्या पूर्णत्वाचा कालावधी :-**

सन २०१६-१७ मध्ये विहीरीच्या कामांना प्रशासकिय मान्यता दिल्यानंतर ३० जून २०१७ पर्यंत विहीरींची काम पूर्ण करणे अनिवार्य राहील.

८. **विहिरींच्या कामांची गुणवत्ता व सुरक्षितता :-**

मजूरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने लाभार्थ्याने आवश्यक ती खबरदारी घ्यावी. ती लाभार्थ्यांची जबाबदारी असेल.

९. **कामाचे पूर्णत्वाचे दाखले निर्गमित करणे**

अ) ज्या तांत्रिक अधिकाऱ्याने कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे त्याच पदाच्या तांत्रिक अधिकाऱ्याने पूर्णत्वाचे दाखले निर्गमित करावे.

ब) अंदाजपत्रकाप्रमाणे काम भौतिकदृष्ट्या व्यास व खोलीमध्ये पूर्ण झाल्यास पूर्णत्वाचा दाखला निर्गमित करावा.

क) विहित केलेल्या खोलीपेक्षा आधिच ०.४० हेक्टर क्षेत्राचा सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यास व विहिर सुरक्षित स्थितीत आहे याची खात्री पटल्यास संबंधित लाभधारक यांची संमती आणि क्षेत्रिय तांत्रिक अधिकारी यांच्या जबाबदारीवर विहिर कामाचे पूर्णत्वाचे दाखले निर्गमित करता येवू शकेल.

ड) अंदाजपत्रकाप्रमाणे मंजूर रक्कम खर्च झाली आहे मात्र बांधकाम प्रलंबित आहे अशा स्थितीत पूर्णत्वाचा दाखला निर्गमित करु नये. कामाच्या शेवटच्या हप्त्याची मागणी करताना कामाचे पुर्णत्वाचा दाखला कामाचा फोटो व मुल्यांकन सादर करणे अनिवार्य राहील.

इ) विहीरी वेळेत पुर्ण करणेबाबत कृषि विकास अधिकारी व पंचायत समिती स्तरावरुन नियमित आढावा घ्यावा.

फ) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुक आचारसंहीतेमुळे नवीन विहीरी या आर्थिक वर्षात पुर्ण करणे शक्य नसल्याने सदर विहीरीचे काम पुर्ण करण्यास जुन २०१७ पर्यंत शासनाने मान्यता दिली आहे. शासनाने विहीत केलेल्या मुदतीत विहीरीची कामे पुर्ण करणे लाभार्थ्यावर बंधनकारक राहील. त्यास विहीत कालावधी संपल्यानंतर अपुर्ण कामासाठी मुदतवाढ दिली जाणार नाही याची लेखी सुचना कृषि विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांना देण्याची दक्षता घ्यावी.

लाभार्थीस आर्थिक वर्षात पूर्ण लाभ देण्याचे दृष्टीने विहीरीचे काम सदर कालावधीत पूर्ण करुन घेण्याबाबत संबंधीतांना स्पष्टपणे सुचना लेखी द्याव्यात व संबंधीत अधिका-यांनी त्याबाबत दक्षता घ्यावी.

नवीन विहीर या बाबीची तपासणी तसेच विहीरी वेळेत पुर्ण केल्या जातात किंवा नाही याची दरमहा क्षेत्रीय तपासणी करुन कृषि विकास अधिकारी यांनी आढावा घ्यावा. नवीन विहीरीचे काम निर्धारित वेळेत पुर्ण करणेबाबत लाभार्थ्याकडुन लेखी घेण्यात यावे. लाभार्थ्यास विहीत मुदत संपल्यानंतर पुन्हा अनुदान मिळणार नाही याबाबतची स्पष्ट जाणीव पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांनी लाभार्थ्यांना दयावी. विहीत मुदतीत विहीरीचे काम पुर्ण करुन घेणेबाबत कृषि अधिकारी पंचायत समिती, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) व कृषि विकास अधिकारी यांनी नियमित आढावा घेवून कामे पुर्ण करुन घ्यावीत. विहीरीचे काम सुरु करण्यापुर्वी कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी क्षेत्र पहाणी करुन विहीरीची आखणी करुन दयावी तसेच लाभार्थ्यांने मागणी केलेल्या व मंजूर क्षेत्रातच विहीर खोदाई करणे गरजेचे आहे.

विहीरीचे काम सुरु केल्यानंतर दर दहा दिवसांनी कृषि अधिकारी, पंचायत समिती यांनी कामास भेट देवून पुर्ण झालेल्या कामाचे देय अनुदान पुढील १५ दिवसांचे आत लाभार्थीच्या बँक खात्यात आरटिजीएस / एनईएफटीव्दारे जमा करावे. याबाबत जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी नियमित आढावा घ्यावा. शेतकऱ्यांना वेळेत अनुदान अदा करुन कामे विहीत मुदतीत पुर्ण करुन घ्यावीत. शेतकऱ्यांकडुन कामे अपुर्ण रहात असल्यास त्याबाबतचे अभिलेख तयार करावेत.

१०. डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी या आर्थिक वर्षात अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. प्रचलीत विशेष घटक योजनेअंतर्गत आपले जिल्हयासाठी मंजूर निधीतून कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

११. दिनांक ०५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सन २०१६-१७ या वर्षासाठी १०००० नवीन विहीरीचे उद्दीष्ट राज्यासाठी निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हानिहाय उद्दीष्ट परिशिष्ठ दोन मध्ये देण्यात आले आहे.

**संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

परिशिष्ट २

| अ.क्र. | जिल्हा/ विभाग | नवीन विहीर लक्षांक |
|---|---|---|
| १ | ठाणे | २५ |
| २ | पालघर | १५ |
| ३ | रायगड | ५० |
| ४ | रत्नागिरी | ५० |
| ५ | सिंधुदुर्ग | ४० |
| **ठाणे विभाग** | | १८० |
| ६ | नाशिक | २६० |
| ७ | धुळे | २६० |
| ८ | नंदुरबार | ७० |
| ९ | जळगांव | ४६० |
| **नाशिक विभाग** | | १०५० |
| १० | अहमदनगर | ३७५ |
| ११ | पुणे | १९५ |
| १२ | सोलापूर | ४०० |
| **पुणे विभाग** | | ९७० |
| १३ | सातारा | १०० |
| १४ | सांगली | १७३ |
| १५ | कोल्हापूर | १३५ |
| **कोल्हापूर विभाग** | | ४०८ |
| १६ | औरंगाबाद | ३०० |
| १७ | जालना | २५० |
| १८ | बीड | ५०० |
| **औरंगाबाद विभाग** | | १०५० |
| १९ | लातूर | २०० |
| २० | उस्मानाबाद | १०० |
| २१ | नांदेड | ५२२ |
| २२ | परभणी | ५०० |
| २३ | हिंगोली | ५७० |
| **लातूर विभाग** | | १८९२ |
| २४ | बुलढाणा | ७०० |
| २५ | अकोला | ६०० |
| २६ | वाशिम | ७०० |
| २७ | अमरावती | ३५० |
| २८ | यवतमाळ | ४०० |
| **अमरावती विभाग** | | २७५० |
| २९ | वर्धा | ३०० |
| ३० | नागपूर | ३०० |
| ३१ | भंडारा | १०० |
| ३२ | गोंदिया | १०० |
| ३३ | चंद्रपूर | ३०० |
| ३४ | गडचिरोली | ६०० |
| **नागपूर विभाग** | | १७०० |
| **एकूण राज्य** | | १०००० |